# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२३

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

## प्रश्नांची एकूण संख्या - २०

---

### रायगड जिल्ह्याच्या शिक्षण विभागात अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(१) ३१०४ (०२-०६-२०२०) ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील शिक्षण विभागात पदे रिक्त असून ६० टक्के जागेवर अतिरिक्त पदभार देण्यात आल्याची माहिती माहे एप्रिल, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षण विभागात मनुष्यबळाची कमतरता असून उपलब्ध शिक्षकांना मतदार याद्या, मतदान, जन्म-मृत्यू नोंदणी, जनगणना यासारखी अनेक कामे दिली जातात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रायगड जिल्हा शिक्षण विभागातील रिक्त पदे भरून शिक्षणाचा दर्जा वाढवून सर्व शिक्षा अभियानाबरोबरच अनेक गोष्टींना येणाऱ्या अडचणी दूर करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०६-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे.

शिक्षकांना मतदार याद्या, जनगणना आपत्तीचे व्यवस्थापन व्यतिरिक्त इतर गैर शैक्षणिक कामे दिली जात नाहीत.

(३) आधार प्रमाणित संचमान्यतेनुसार शासन निर्णय दिनांक २१/०६/२०२३ नुसार रिक्त पदाच्या ८० टक्के पदे बिंदु नामावलीप्रमाणे पवित्र प्रणालीद्वारे भरण्याकरीता परवानगी देण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत मा.उच्च न्यायालय,खंडपीठ औरंगाबाद येथे भरती प्रकरणी जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. मा.न्यायालयाने पवित्र पोर्टलद्वारे करण्यात येणाऱ्या भरतीवरील स्थगीती दिलेली होती. सदर स्थगीती मा.न्यायालयाने उठविली असून,त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे. तथापि, भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता सेवानिवृत्त शिक्षकांचे कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची अनुदानित पदावर बदली करण्याबाबत

**(२) ५७८९ (१३-१२-२०२०) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात खाजगी व्यवस्थापनाच्या शाळेतील शिक्षकांची विनाअनुदानित जागेवरुन अनुदानित जागेवर बदली करण्याबाबत शासनाने दिनांक २८ जून, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन आदेशानुसार रिक्त असलेल्या जागेवर फक्त शिक्षकांचीच बदली करत असल्याने दिनांक २८ जून, २०१५ चा शासन आदेश शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शासन आदेश शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०७-११-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) शासनाने शासन परिपत्रक दिनांक ०१/११/२०२२ अन्वये विनाअनुदानित जागेवरून अनुदानित जागेवर शिक्षकांच्या बदलीस स्थगिती दिली असून, याप्रकरणी राज्यात झालेल्या गैरप्रकाराची चौकशी करण्याबाबत आयुक्त (शिक्षण) यांना निर्देशित केले आहे. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बदली संदर्भात शासन स्तरावर उचित निर्णय घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमधील अतिरिक्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना समायोजित करून सेवा संरक्षण देण्याबाबत

**(३) ९३१६ (२०-०७-२०२१) श्री.किरण सरनाईक :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवाशर्ती) नियमावली, १९८१ मधील तरतुदींच्या अधीन आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अंशत: अनुदानित शिक्षकांसाठी सेवासातत्य, सेवा संरक्षण व समायोजनाचा आदेश निर्गमित करणेबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे माहे मे, २०२१ च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले असून नियम-२६ नुसार १०० टक्के अनुदानित शाळांतील अतिरिक्त शिक्षक कर्मचाऱ्यांना अन्य शाळेत समायोजित करुन सेवा संरक्षण देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्याच नियमानुसार व त्याच धर्तीवर विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमधील अतिरिक्त शिक्षकांना समायोजित करुन सेवा संरक्षण प्रदान करण्याची मागणी नागपूर विभागाच्या शिक्षक

लोकप्रतिनिधींनी शासनास दिनांक १५/१२/२०२० व ०५/०५/२०२१ रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन अंशत: अनुदानित शिक्षकांसाठी सेवासातत्य, सेवा संरक्षण व समायोजनाचा आदेश निर्गमित करण्याबाबत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०६-११-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) शासनाने शासन निर्णय दिनांक १२/१२/२०२२ अन्वये अंशत: अनुदानित शाळेतील अतिरिक्त होत असलेल्या शिक्षकांना त्याच अनुदानाच्या टप्प्यावर समायोजन करून सेवा संरक्षण देण्याचा निर्णय घेतला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिक्षण विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४) १४५५७ (२५-०८-२०२२) श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.सुरेश धस, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, ॲड.निरंजन डावखरे, श्री.राजहंस सिंह, श्री.रमेशदादा पाटील : दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ९ मधील प्रश्न क्रमांक ८७६१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याच्या शिक्षण विभागात एकूण मंजूर पदांपैकी केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, गट शिक्षणाधिकारी, उप शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी, शिक्षण उपसंचालक, शिक्षण सहसंचालक पदांची एकूण ३०४६ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र प्रमुखांची २९२५ पदे रिक्त असल्याने एका केंद्र प्रमुखाकडे किमान दोन ते तीन केंद्रांचा अतिरिक्त भार देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांवर पडणारा कामाचा ताण व शिक्षणाच्या दर्जावर होणारा परिणाम लक्षात घेता तातडीने रिक्त पदे भरण्याबाबत विविध शिक्षक संघटनांनी शासनाकडे वारंवार मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०६-११-२०२३) :** (१), (२) व (३) हे खरे आहे.
(४) केंद्र प्रमुखांची ५० टक्के पदे विभागीय परीक्षेद्वारे व ५० टक्के पदे पदोन्नतीने भरण्यास शासन निर्णय दिनांक ०१/१२/२०२३ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे विभागीय परिक्षाद्वारे भरावयाची ५० टक्के पदांकरीता जाहिरात देण्यात आली असून, पदोन्नतीचीही प्रक्रिया जिल्हा परिषदेच्या स्तरावर सुरू आहे. ग्रामविकास विभागाने दिनांक १५ जून, २०२३ रोजीच्या पत्राने केंद्रप्रमुख व विस्तार अधिकाऱ्याची पदोन्नतीची पदे भरण्या संदर्भातही आवश्यक सूचना निर्गमित केल्या आहेत. गटशिक्षणाधिकारी, उप

शिक्षणाधिकारी, शिक्षणाधिकारी या पदाची सरळसेवेने पदे भरण्याकरीता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठविण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कळमना (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील बल्लारपूर पेपर मिलमधील बांबू डेपोला लागलेल्या आगीत नुकसान झाल्याबाबत

**(५) १४८२० (२७-०६-२०२२) श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कळमना (ता.बल्लारपूर, जि.चंद्रपूर) येथील बल्लारपूर पेपर मिलच्या बांबू डेपोला भीषण आग लागून रुपये ५० कोटीचे बांबू व लाकडे जळून नष्ट झाल्याची घटना दिनांक २४ मे, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील (३०-०८-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
बल्लारपूर तालुक्यातील कळमना येथील खाजगी जागेतील पेपरमिल डेपोला दिनांक २२ मे २०२२ रोजी आग लागून कच्चा माल जळाल्याची घटना घडली आहे. प्राप्त अहवालामध्ये एकूण रुपये ३०.१८ कोटी इतके नुकसान झाल्याचे नमूद केले आहे.
(२) सदर मिल खाजगी असून आग खाजगी जागेत लागली असल्याने या आगीची शासनाकडून चौकशी करण्याचा व दोषी व्यक्तींवर कारवाई करण्याचा कोणताही प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात शिक्षण हक्क कायद्यानुसार सर्व शाळांना पुरेसे शिक्षक आणि सर्व शैक्षणिक सेवा सुविधा पुरविण्याबाबत

**(६) १५०६१ (०७-१०-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक १३९९७ ला दिनांक १८ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार सुमारे ३ हजार ४६६ शाळा या एक शिक्षकी असल्याने विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रत्नागिरी, पुणे, सिंधुदुर्ग, रायगड, पालघर, सातारा, गडचिरोली, यवतमाळ, कोल्हापूर या जिल्ह्यातील बहुतांश शाळा एक शिक्षकी आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यात शिक्षण हक्क कायद्यानुसार सर्व शाळांना पुरेसे शिक्षक आणि सर्व शैक्षणिक सेवा सुविधा तात्काळ देण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०७-११-२०२३) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) आधार प्रमाणित संचमान्यतेनुसार शासन निर्णय दिनांक २१/०६/२०२३ नुसार रिक्त पदाच्या ८० टक्के पदे बिंदु नामावलीप्रमाणे पवित्र प्रणालीद्वारे भरण्याकरीता परवानगी देण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे भरती प्रकरणी जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. मा.न्यायालयाने पवित्र पोर्टलद्वारे करण्यात येणाऱ्या भरतीवरील स्थगिती दिलेली होती. सदर स्थगिती मा.न्यायालयाने उठविली असून, त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे. तथापि, भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता सेवानिवृत्त शिक्षकांचे कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात शासकीय व खाजगी शाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(७) १५०६२ (३१-१०-२०२२) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासकीय व खाजगी शाळा अशा एकूण ३५ हजार १४१ शाळांमध्ये महिला शिक्षिका नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त शाळांमध्ये महिला तसेच पुरुष शिक्षकांचीही रिक्त पदे भरणार आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिपक केसरकर (०६-११-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) आधार प्रमाणित संचमान्यतेनुसार शासन निर्णय दिनांक २१/०६/२०२३ नुसार रिक्त पदाच्या ८० टक्के पदे बिंदु नामावलीप्रमाणे पवित्र प्रणालीद्वारे भरण्याकरीता परवानगी देण्यात आलेली आहे. सद्य:स्थितीत मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे भरती प्रकरणी जनहित याचिका दाखल करण्यात आली आहे. मा.न्यायालयाने पवित्र पोर्टलद्वारे करण्यात येणाऱ्या भरतीवरील स्थगिती दिलेली होती. सदर स्थगिती मा.न्यायालयाने उठविली असून, त्यानुसार पुढील कार्यवाही सुरू आहे. तथापि, भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरीता सेवानिवृत्त शिक्षकांचे कंत्राटी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील रात्रशाळांसाठी स्वतंत्र धोरण जाहीर करण्याबाबत

**(८) १५४८२ (२८-१२-२०२२) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.रामदास आंबटकर, श्री.प्रवीण दटके, श्री.शशिकांत शिंदे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे : तारांकित प्रश्न क्रमांक १४००० ला दिनांक २५ ऑगस्ट, २०२२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अतिशय गरीब व आर्थिक परिस्थिती बिकट असलेले विद्यार्थी दिवसा काम करुन रात्रशाळांमधून शिक्षण घेत असतात, तसेच मुंबईतील शिक्षण विभागाच्या उत्तर-दक्षिण आणि पश्चिम शैक्षणिक क्षेत्राच्या कार्यक्षेत्रात १२० रात्रशाळा कार्यरत असून या रात्रशाळांत सुमारे १२ हजार विद्यार्थी नोकरी व कामधंदा करुन शिक्षण घेत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रात्रशाळांवर घटत्या विद्यार्थीसंख्येचे संकट असून इंग्रजी, गणित आदि विषयांचे शिक्षकही मिळत नाहीत तसेच मुंबईतील बहुतांश रात्रशाळा ह्या पालिकेच्या शाळांच्या इमारतीत भरत असून त्यासाठी आकारले जाणारे भाडेमाफ केले जावे तसेच वीज बिलाचा प्रश्नही सोडवावा व या रात्रशाळांसाठी स्वतंत्र धोरण जाहीर करण्याची मागणी शिक्षण क्षेत्रातून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रात्रशाळांबाबत सर्व समावेशक धोरण तयार करण्यात येणार असल्याचे तसेच शिक्षण हक्क कायदयानुसार विनाअनुदानित शाळांच्या स्वमान्यतेची प्रक्रिया सुटसुटीत करण्यासाठी एक स्वतंत्र प्रणाली विकसित करण्याचे व प्रलंबित असलेल्या सर्व शाळांना मान्यता देण्याची प्रक्रिया देखील तातडीने राबविण्याबाबत विभागाचे संबंधित अधिकाऱ्यांना आदेश देण्यात येतील, असे मा.शालेय शिक्षण मंत्री यांनी विधीमंडळ सभागृहात जाहीर केले असल्याचे दिनांक २६ ऑगस्ट, २०२२ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या रात्रशाळेतील शिक्षकांना त्यांच्या सेवेमध्ये कोणत्याही प्रकारचे संरक्षण नसून पूर्णवेळ शिक्षकांप्रमाणे काम करुनही त्यांना अर्धे वेतन दिले जाते तसेच रात्रशाळांचे तास कमी करुन साडेतीन तासाहून अडीच तास केल्याने, नियमित शाळेत शिक्षक म्हणून नोकरी करणाऱ्या शिक्षकांना रात्र शाळेत काम करण्याची परवानगी देण्यात आली असल्याचे शासनाने माहे जुलै, २०२२ मध्ये निर्गमित केलेल्या शासन निर्णयात नमूद केले असून त्यास शिक्षक संघटनांचा विरोध असल्याचे दिनांक ५ ऑक्टोबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, तसेच रात्रशाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयामध्ये काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कायमस्वरूपी सेवेत सामावून घेण्याचा दिनांक १७ मे, २०१७ रोजीचा शासन निर्णय रद्द करून दिनांक ३० जून २०२२ चा शासन निर्णय लागू केल्याने रात्रशाळा शिक्षकावर अन्याय होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०२२ ला निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले तदनुषंगाने रात्र शाळांच्या सक्षमीकरणासाठी, तसेच शिक्षक व कर्मचारी यांना संरक्षण देऊन सेवेत कायम करण्याबाबत व रात्रशाळा शिक्षकांवर अन्याय करणारा दिनांक ३० जून,२०२२ चा शासन निर्णय रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दिपक केसरकर (०६-११-२०२३) :** (१), (२), (३) व (४) हे खरे आहे.
(५) रात्रशाळा संदर्भात सर्वकष धोरण ठरविण्याकरीता शासन निर्णय दिनांक ०८/१२/२०२२ अन्वये आयुक्त (शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून, या समितीच्या अहवालानुसार उचीत कार्यवाही करण्यात येईल.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(९) १७०३५ (२५-०३-२०२३) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आस्थापनेवरील अध्यक्ष, सदस्य सचिव यांच्यासह वर्ग १ ते वर्ग ४ संवर्गातील एकूण ८३९ मंजूर पदांपैकी ३४९ पदे रिक्त असल्याचे दिनांक १ डिसेंबर, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या आस्थापनेवरील विविध संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (११-०९-२०२३) :** (१) व (२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातील सर्व संवर्गातील सरळसेवा कोट्यातील रिक्त पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्याबाबतचा प्रस्ताव दिनांक ०६/०६/२०२२ च्या पत्रान्वये आयोगास पाठविण्यात आला. तसेच सर्व संवर्गातील पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे मंडळाने गठीत केलेल्या विभागीय पदोन्नती समितीमार्फत नियमितपणे भरण्याची कार्यवाही केली जात आहे.
(३) प्रश्न उद्धभवत नाही.

---

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील बिनशेती परवानगी प्रस्ताव निकाली काढण्याबाबत

**(१०) १८२२४ (२५-०३-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील बिनशेती परवानगी प्रस्ताव निकाली काढण्याबाबत नगररचना विभागाकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नगररचना विभागाकडे मुक्ताईनगर येथील बिनशेती परवानगीचे किती प्रकरणे प्रलंबित आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुक्ताईनगर येथील बिनशेती प्रस्ताव प्रलंबित ठेवणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करुन बिनशेती प्रस्ताव निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१५-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही,
(२) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील बिनशेती परवानगी प्रस्ताव निकाली काढण्याबाबतचे एकूण १० अभिन्यास मंजुरीचे प्रस्ताव माहे नोव्हेंबर, २०२२ ते मार्च, २०२३ पावेतो नगरपंचायत मुक्ताईनगर कार्यालयाकडून नगररचना शाखा कार्यालयास प्राप्त झालेले होते. त्यापैकी ०६ प्रस्ताव निकाली काढलेले आहेत व उर्वरीत ०४ प्रस्ताव प्रलंबित असल्याचे सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग नाशिक यांनी दिनांक ०६/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.
(३) उक्त ०४ प्रलंबित प्रस्ताव नगररचना शाखा कार्यालयास दिनांक २८/०२/२०२३ व त्यानंतर प्राप्त झालेले असून उक्त अभिन्यास मंजुरीबाबत योग्य ती कार्यवाही सुरु आहे. म्हणजेच, सदर प्रस्ताव प्राप्त होऊन साधारणपणे एक महिन्याचा कालावधी झालेला असल्याने उक्त प्रस्ताव निकाली काढण्याबाबत नगररचना विभागाकडून जाणीवपूर्वक विलंब झाला असल्याचे दिसून येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौजे शिवडाव (ता.कणकवली, जि.सिंधुदूर्ग) येथील घाटी रस्त्याच्या नुतनीकरणाचे काम सुरु करण्याबाबत

**(११) १८८०० (२०-०६-२०२३) श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शिवडाव (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील शिवडाव हायस्कूल ते पटेलवाडी पर्यंत जाणाऱ्या घाटी रस्त्याची मोठ्या प्रमाणावर दुरवस्था झाली असून ग्रामस्थांची विशेषतः विद्यार्थ्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय होत असल्याची बाब दिनांक ३ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने मौजे शिवडाव (ता.कणकवली, जि.सिंधुदुर्ग) येथील शिवडाव हायस्कूल ते पटेलवाडी पर्यंत जाणाऱ्या घाटी रस्त्याच्या नूतनीकरणाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१९-१०-२०२३) :** (१) व (२) होय, मौजे ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग येथील शिवडाव हायस्कूल ते पटेलवाडी पर्यंत जाणाऱ्या घाटी (शिवडाव माळ ते पटेलवाडी) ०/० ते १/००० पर्यंत रस्ता ग्रामपंचायत नमूना नं.२३ (ग्रा.पं. ताब्यातील रस्त्यांची नोंदवही) मध्ये नोंद आहे. सदर रस्ता हा १ कि.मी.चा असून ०/०० ते ०/१७१ किमी भाग हा डांबरीकरण झालेला आहे. तसेच ०/१७१ ते ०/७३६ हा भागाचा रस्ता कच्चा मुरमाचा आहे आणि ०/७३६ ते १/००० हा खराब खडीकरण/डांबरीकरण झालेला

आहे. परंतु पावसामध्ये मोठ्या प्रमाणात दलदल होते त्यामूळे ग्रामस्थ व शाळेतील विद्यार्थ्यांची गैरसाय होते ही बाब खरी आहे.

सदर १ कि.मी. रस्त्याच्या नूतनीकरणासाठी रुपये ३०.०० ते ३५.०० लक्ष निधीची आवश्यकता आहे. लेखाशीर्ष २५१५ १२३८ योजनेंतर्गत उपरोक्त विकास कामे घेण्यास मा.लोकप्रतिनिधींना मुभा आहे. सबब, योजनेतील अटी व शर्तीनुसार त्यातून वरील विकास काम करणे शक्य आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## निलंबित मुख्याधिकारी, धाराशिव नगरपरिषद यांच्या कालावधीत झालेल्या बोगस गुंठेवारीबाबत

**(१२) १९००६ (०८-०८-२०२३) श्री.सुरेश धस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धाराशिव नगरपरिषदेतील निलंबित मुख्याधिकारी हे धाराशिव नगरपरिषदेत रुजु झाल्यानंतरच्या त्यांच्या कार्यकाळात बनावट गुंठेवारी, खुल्या जागेमधील मधील गुंठेवारी मोठ्या प्रमाणावर झाली असून नगर अभियंता, सेवानिवृत्त नगर अभियंता तसेच लिपिकाच्या स्वाक्षरीने गुंठेवारी करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संचिका गहाळ होवुनही गुन्हा दाखल करण्यास जाणीवपुर्वक टाळाटाळ करणाऱ्या विद्यमान मुख्याधिकाऱ्यांवर सह-आरोपी म्हणून अद्याप गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बेकायदेशीर गुंठेवारी करुन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार करणारे, संचिका जाणीवपूर्वक गहाळ करणाऱ्या लिपिक तसेच नगर अभियंता, मुख्याधिकारी यांच्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमून कठोर कारवाई करण्यासाठी शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने निलंबित मुख्याधिकारी, धाराशिव नगरपरिषद यांच्या कार्यकाळातील गुंठेवारी करण्यात आलेल्या प्रकरणांची चौकशी करण्याकरीता जिल्हाधिकारी, धाराशिव यांच्या दिनांक २४ एप्रिल, २०२३ रोजीच्या आदेशान्वये सहाय्यक संचालक, नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग, धाराशिव यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आली असून अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यात सात वाहन काळापासून असणाऱ्या २० हजार बारवांचे पुनरुज्जीवन करण्याबाबत

**(१३) १९४७५ (०८-०८-२०२३) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सात वाहन काळापासून असलेल्या ऐतिहासिक २० हजार बारव दुरावस्थेत असल्याचे आढळून आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात सात वाहन काळापासून २० हजार दुरावस्थेत असलेल्या बारवांना पुनरुज्जीवीत करण्याचा निर्णय शासनाने दिनांक २५ मे,२०२३ रोजी वा त्या सुमारास घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२९-११-२०२३) :** (१) हे खरे नाही.

राज्यात २० हजार बारव अस्तित्वात असल्याचे वा दुरावस्थेत असल्याबाबत कोणतीही अधिकृत नोंद केली गेलेली नाही.
(२) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यातील उत्कृष्ट स्थापत्यशैलीचा नमुना असलेल्या ७५ प्राचीन बारवांचे संवर्धन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.
(३) विभागीय कार्यालयांकडून आराखडे प्राप्त झाल्यानंतर जिल्हा नियोजन समितीची मंजूरी घेऊन तसेच तांत्रिक तपासणी करुन निधीच्या उपलब्धेनुसार सदर ७५ बारवांची जतन/ दुरुस्तीबाबतची कार्यवाही पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालयामार्फत करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुरखेडा-देसाईगंज (जि.गडचिरोली) महामार्गावरील झाडावर वीज कोसळून ४ व्यक्तींचा झालेल्या मृत्यूबाबत

**(१४) २००८९ (०८-०८-२०२३) श्री.विक्रम काळे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुरखेडा-देसाईगंज (जि.गडचिरोली) महामार्गावर अचानक मेघगर्जनेसह पाऊस सुरु झाल्यामुळे एका झाडाखाली आडोशाला थांबले असताना श्री.भारत लक्ष्मण राजगडे, श्रीमती अंकिता भारत राजगडे, कुमारी देव्यांशी भारत राजगडे व कुमारी अंकिता भारत राजगडे या २ चिमुकल्यांसह ४ व्यक्तींचा दिनांक २३ एप्रिल, २०२३ रोजी दुर्देवी मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, लातूर जिल्ह्यातील औसा तालुक्यातील टेंबी येथे राहणाऱ्या शौकत इस्माईल सय्यद यांचासूध्दा वीज कोसळून दुर्देवी मृत्यू झाला आहे, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या दुर्घटनेत मृत्यू पावलेल्या कुटूंबियांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील (१५-०९-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३,दिनांक २७ मार्च, २०२३ मधील तरतूदी नुसार दिवंगत व्यक्तीच्या वारसास प्रतीव्यक्ती रुपये ४.०० लक्ष याप्रमाणे मदत देण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव महानगरपालिकेअंतर्गत अमृत योजनेचे काम पूर्ण करण्याबाबत

**(१५) २०१२१ (०९-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोदवड (ता.बोदवड, जि.जळगाव) येथे नव्याने स्थापन झालेल्या नगरपंचायतीसाठी मुक्ताईनगर येथील हतनूर जलाशयाच्या उद्भावातून पाणीपुरवठा योजना प्रस्तावित असून सदर योजनेस अद्यापही प्रशासकीय मान्यता प्राप्त न झाल्याने नागरिकांचे पाण्याअभावी हाल होत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जळगाव महानगरपालिका अंतर्गत अमृत योजनेचे काम गत पाच वर्षांपासून अपूर्णाअवस्थेत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बोदवड शहरास पाणीपुरवठा करणारी योजना मंजूर करून पूर्णत्वास नेण्याबाबत तसेच जळगाव जिल्ह्यातील अमृत योजनेचे काम विहित वेळेत पूर्ण न करणाऱ्या संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-१२-२०२३) :** (१) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत बोदवड नगरपंचायतचा रुपये ७२.२१ कोटी किंमतीचा पाणीपुरवठा प्रकल्पाचा प्रस्ताव अमृत २.० अभियानाच्या पोर्टलवर शासनास प्राप्त झालेला असून सदर प्रकल्पाची मुख्य सचिव महोदयांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय उच्चाधिकार सुकाणू समितीने केंद्र शासनाच्या शिखर समितीकडे शिफारस केलेली असून केंद्र शासनाच्या अंतिम मान्यतेनंतर सदर प्रकल्पाच्या मान्यतेच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(२), (३) व (४) केंद्र पुरस्कृत अमृत अभियानांतर्गत जळगाव शहराच्या रुपये २५३.२३ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात आलेली असून सदर प्रकल्पातील वितरण व्यवस्थेच्या कामात झालेली वाढ, काही कामांच्या परिमाणात तांत्रिक व विवरणात झालेले बदल, कोव्हीड-१९ मुळे मंदावलेला वेग, वितरण वाहिन्या नव्याने टाकल्यामुळे नवीन जलवाहिनी चाचणी घेण्याची कामे दैनंदिन पाणीपुरवठा संतुलित ठेवून करावी लागणे इ. कारणांमुळे प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यास विलंब झालेला असून सद्य:स्थितीस सदर प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे.

बोदवड नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास केंद्र शासनाच्या शिखर समितीच्य अंतिम मान्यतेनंतर सदर प्रकल्पाच्या मान्यतेच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

---

## जळगाव (ता.चाळीसगाव) जिल्ह्यातील मुंदखेडा प्रकल्पासाठी संपादित जमिनीचा पूर्ण मोबदला देणेबाबत

**(१६) २०१५७ (०४-०८-२०२३) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव (ता.चाळीसगाव) जिल्ह्यातील मुंदखेडा प्रकल्पासाठी संपादित जमिनीचा पूर्ण मोबदला अद्यापही देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंदखेडा प्रकल्पासाठी संपादित जमिनीचा पूर्ण मोबदला देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०८-१२-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) उपलब्ध निधी मधून भूसंपादन मोबदला अदायगी प्रगतीत आहे.
(३) निधी उपलब्ध नसल्याने विलंब होत आहे.

---

## राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नीचे वाढीव मानधन व मागील थकबाकी मिळण्याबाबत

**(१७) २०२८७ (०४-०८-२०२३) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नींना दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ रोजी पासून राज्य शासनाने प्रतिमाह १० हजार रुपये मानधन जाहीर असून सदरहू मानधन अत्यल्प असल्याने ते वाढविण्याबाबतची मागणी मा.मंत्री, वित्त व नियोजन यांचेकडे दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३ रोजी वा त्यादरम्यान पत्राद्वारे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नींना वाढीव मानधन व थकबाकी मिळण्यासाठी जिल्हाधिकारी बुलढाणा यांचेकडे बरेचसे अर्ज दाखल करूनही माहे, फेब्रुवारी, मार्च, २०२३ अखेरपर्यंत मानधनाची व थकबाकीची रक्कम अदा करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य शासनाने बुलढाणा जिल्ह्यातील तसेच राज्यातील स्वातंत्र्य सैनिकांच्या पत्नींच्या मानधनात वाढ करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (१३-०९-२०२३) :** (१) नाही, हे खरे नाही.
शासन निर्णय दिनांक २२ नोव्हेंबर, २०२२ अन्वये दिनांक १ नोव्हेंबर, २०२२ पासून राज्यातील स्वातंत्र्य सैनिक/त्यांचे जोडीदार यांच्या स्वातंत्र्य सैनिक निवृत्तिवेतनामध्ये रुपये १०,०००/- इतकी वाढ करुन दरमहा रुपये २०,०००/- इतके निवृत्तिवेतन अनुज्ञेय केले आहे.
(२) व (३) राज्यातील स्वातंत्र्य सैनिक/ त्यांचे जोडीदार यांना माहे नोव्हेंबर, २०२२ पासून रुपये २०,००० /- इतके निवृत्तिवेतन नियमितपणे प्रदान केले जात असल्यामुळे, थकबाकीची रक्कम अदा करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कुकडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथील गट नं. १३० मधील संपादित क्षेत्रामध्ये आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत

**(१८) २०३८० (०८-०८-२०२३) प्रा.राम शिंदे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुकडी (ता.कर्जत, जि.अहमदनगर) कालव्याचे चिलवडी शाखा कालवा क्र. ६ ते १० करीता मौजे बेनवडी येथिल गट नं. १३० मधील संपादित क्षेत्रामध्ये आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत संबंधिताविरुध्द कारवाई करण्याची मागणी श्री.भाऊसाहेब रामभाऊ क्षीरसागर यांनी दिनांक ८ जून, २०२३ रोजी मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री, मा.महसूल मंत्री, मा.प्रधान सचिव, महसूल, मा.प्रधान सचिव, गृह यांना निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अद्यापपर्यंत संपादित क्षेत्रामध्ये आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत संबंधिताविरुध्द कारवाई केली नसल्याने दिनांक १ जून, २०२३ पासून आमरण उपोषण सुरु केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (२१-११-२०२३) :** (१), (२) व (३) कुकडी कालव्याचे चिलवडी शाखेच्या संपादित क्षेत्रामध्ये आर्थिक गैरव्यवहार केल्याबाबत, संबंधिताविरुध्द कारवाई करण्याच्या मागणी बाबतचे श्री.भाऊसाहेब रामभाऊ क्षीरसागर यांच्या दिनांक ८ जून, २०२३ रोजीच्या निवेदनाची प्रत जिल्हाधिकारी, अहमदनगर यांच्याकडे दिनांक २२/०६/२०२३ रोजी प्राप्त झाली. सदर प्रकरणी श्री.क्षिरसागर यांनी दिनांक १ जून, २०२३ रोजी आमरण उपोषण केले.

कुकडी डावा कालव्यावरील सा.क्र. १९२/१३० मधील चिलवडी शाखा कालवा कि.मी ६ ते ९ मधील भूसंपादन प्रस्तावामधील गट नंबर १३० मौजे बेनवडी, ता.कर्जत मधील १.१४ हे. आर जमीन थेट खरेदी पध्दतीने संपादन केली आहे.

सदर गट नं १३० मधील सहहिस्सेदार श्री.भाऊसाहेब रामभाऊ क्षीरसागर यांच्या तक्रारी अनुषंगाने केलेल्या प्राथमिक चौकशी मध्ये, वहिवाटीनुसार तक्रारदार यांचे हिस्साचे ०.१४ हे. आर क्षेत्र संपादित होत असून, या जमिनीपैकी ०.११ हे. आर जनिमीचा मोबदला रुपये ७,९९,१८०/- श्री.गुलाब रामभाऊ क्षीरसागर यांना तर ०.०३ हे. आर जमिनीचा मोबदला रुपये २,१७,९५९/- हा श्री.बबन रामभाऊ क्षीरसागर व अन्य यांना जादाचा अदा करण्यात आला आहे. सदर जादा अदा केलेला मोबदला + व्याज + दस्त दुरुस्तीसाठी होणारा खर्च परत जमा करणेबाबत संबंधितांना नोटीस दिली.

त्यानुसार, दिनांक १४/०८/२०२३ रोजी श्री.गुलाब रामभाऊ क्षीरसागर यांनी रुपये ७,९९,२८०/- पैकी रुपये २,६०,०००/- व श्री.बबन रामभाऊ क्षीरसागर यांचे वारस यांनी रुपये २,१७,९५९/- पैकी रुपये १,३०,०००/- रक्कम कुकडी वितरण बांधकाम विभागास अदा केलेली आहे. परंतु, श्री.गुलाब रामभाऊ क्षीरसागर यांनी सह दिवाणी न्यायालय (व.स्त) श्रीगोंदा येथे स्पेसिफिक रिलीफ ॲक्ट कलम ३४ व ३८ अन्वये कार्यवाही करु नये, असा दिवाणी दावा दाखल केलेला आहे.

सध्या सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या संकेतस्थळावरील तांत्रिक समस्येमुळे अनेक अर्ज स्वीकारले नसल्याबाबत

**(१९) २०५०० (०९-०८-२०२३) श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातील गट-अ वरिष्ठ, गट-अ कनिष्ठ आणि गट-ब अशा श्रेणीच्या ४२ पदांच्या भरतीची जाहिरात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने एप्रिल, २०२३ अथवा त्या सुमारास प्रसिध्द केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरुवातीला सर्व ४२ पदांसाठी सारखीच शैक्षणिक आणि अनुभवाची पात्रता ठेवण्यात आली होती मात्र दिनांक १० एप्रिल, २०२३ रोजी आयोगाने संकेतस्थळावर शुद्धिपत्रक जारी करून त्यामध्ये सोळा प्रकारच्या शैक्षणिक अर्हता ग्राह्य धरण्यात येत असल्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शुद्धिपत्रक काढल्यानंतरही आयोगाच्या संकेतस्थळावर अर्ज स्विकारला जात नसल्याने शेकडो उमेदवार अर्ज करण्यापासून वंचित राहिले असून उमेदवारांची कोणतीही चूक नसताना आयोगाच्या संकेतस्थळावरील तांत्रिक समस्येमुळे अर्ज स्विकारला जात नसल्याने अनेक उमेदवारांना नोकरीची संधी गमावावी लागली, हे सुद्धा खरे आहे का,

(४) असल्यास, संकेतस्थळावरील सदरील अनियमिततेची शासनाने चौकशी केली करुन चौकशीमध्ये काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२८-११-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे,

(२) होय, हे खरे आहे,

काही पदव्यांसंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून प्राप्त पत्रांच्या अनुषंगाने शासनाकडून स्पष्टीकरणात्मक खुलासा आयोगास पाठविण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाद्वारे समतुल्य पदवी तसेच पदव्युत्तर पदवी अर्हताधारक उमेदवारांना अर्ज सादर करण्याकरीता दिनांक १० एप्रिल, २०२३ तसेच दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजी शुध्दीपत्रक प्रसिध्द करण्यात येऊन, दिनांक ८ मे, २०२३ पर्यंत अर्ज करण्यास मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## बीड जिल्ह्यात शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीआई) शिक्षकांची भरती करण्याबाबत

**(२०) ५१७३८ (०५-०७-२०१४) श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात शिक्षण हक्क कायद्यानुसार (आरटीआई) ५६९ प्राथमिक शिक्षकांची गरज आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षक पद निश्चितीची माहिती शिक्षण उपसंचालकांना कळवून पदाच्या मंजूरीबाबतचा प्रस्ताव पाठविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर करुन तातडीने ५६९ प्राथमिक शिक्षकांची भरतीप्रक्रिया राबविण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री.दिपक केसरकर (०९-११-२०२३) :** (१), (२) व (३) आयबीपीएस कंपनीमार्फत आयोजित करण्यात आलेली शिक्षक अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी २०२२ चा निकाल प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर चाचणीमध्ये उमेदवारांना प्राप्त झालेल्या गुणांकनानुसार राज्यातील सर्व जिल्हा परिषद व व्यवस्थापनांच्या शाळांमध्ये शिक्षकांच्या मागणीनुसार पवित्र पोर्टलच्या माध्यमातून उमेदवारांची शिफारस करण्यात येणार आहे. त्यानुसार राज्यात अंदाजे ३०,००० शिक्षकीय पदे भरण्याचा शासनाचा मानस आहे. यामुळे बीड जिल्ह्यात देखील शिक्षक उपलब्ध होणार आहेत.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.